दिनांक : २२ जानेवारी, २०२१

**मा. प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली दि. १३.०१.२०२१ रोजी मंत्रालय, मुंबई येथे झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

दि. १३.०१.२०२१ रोजी कुसुम योजनेच्या "ब" घटकाच्या अंमलबजावणी साठीची बैठक मा. प्रधान सचिव, ऊर्जा यांचे मंत्रालयीन दालनात पार पडली. बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

१. मा. प्रधान सचिव (ऊर्जा)

२. महासंचालक, महाऊर्जा

३. श्री. वाळुंज, सह सचिव, ऊर्जा

४. श्री. बडगेरी, उप सचिव, ऊर्जा

५. श्री. सतिश चव्हाण, संचालक (वाणिज्य), महावितरण

६. श्री. भालचंद्र खंडाईत, संचालक (प्रकल्प), महावितरण

७. श्री. प्रसाद रेशमे, कार्यकारी संचालक, महावितरण

८. श्री. योगेश गडकरी, कार्यकारी संचालक (बीआर), महावितरण

सदर बैठकीत मा. प्रधान सचिवांनी खालीलप्रमाणे निदेश दिले:

**१. ऊर्जा विभागासाठी अपारंपरिक ऊर्जामधील सर्व Grid / Off-Grid प्रकल्प / योजनाकरीता सामायिक संकेतस्थळ (Common Webpage) :-**

- सर्व Renewable projects साठी ऊर्जा विभागाचे Homepage एकच असावे त्यामध्ये महावितरण, महाऊर्जा, महापारेषण, महानिर्मिती यांचा समावेश असावा. पारेषण संलग्न (Grid Connected) व पारेषण विरहित (Off Grid) असे दोन पर्याय असावेत. Grid Connected व off-grid हे अनुक्रमे महावितरण व महाऊर्जाकडे निर्देशित (Redirect) करणेत येतील.
- पारेषण विरहित सोलरपंप (off grid) पर्याय निवडल्यास ग्राहक महाऊर्जाच्या Website वर नोंदणी स्थळावर निर्देशित होईल (कुसुम योजना).
- महावितरणचे Website वरील Homepage वर New या सदराखाली Kusum off grid solar pump असा Icon जाहीरातीच्या दिनांकापासून दोन महिन्यांसाठी float करणेत येईल. महाऊर्जा Website वरही अनुक्रमे पारेषण संलग्न सौर प्रकल्प योजना व पारेषण विरहित सौर

कृषिपंप योजनांसाठीचे Icon float करणेत येतील व त्यावर Click केल्यावर महावितरणचे संबंधीत Web Portal कडे निर्देशित होईल.

२. **कार्यपध्दती :-**

अर्जदाराने ऑनलाईन अर्ज दाखल करताना त्यांची अधिकृत माहिती व कागदपत्रे अपलोड करावी. त्यापैकी सर्वसाधारणपणे खालील कागदपत्रे महत्वाची आहेत.

- ७/१२ गट नंबर, नाव
- आधार कार्ड व नाव
- जातीचा दाखला

जमाबंदी आयुक्तांकडून ही कागदपत्रे PDF Format मध्ये API द्वारा घेण्याचा प्रयत्न करण्यात यावा. दरम्यान अर्जदाराकडील माहिती OCR प्रणालीद्वारे पडताळण्यात येतील व अशा संगणीकृत पडताळणीनंतर ग्राहकाला तत्वत: मान्यता (In principal sanction) मेसेजद्वारे ताबडतोब जाईल व त्यासोबत लाभार्थी हिस्सा भरण्याबाबतची संकेतस्थळाची माहिती प्राप्त होईल. सदर तत्वत: मान्यता मानवी हस्तक्षेपाशिवाय प्राप्त होईल. ती साईट व Document Verification च्या अधीन असेल.

३. लाभार्थ्याने लाभार्थी हिस्सा भरल्यानंतर त्याला Vendor निवडण्याबाबतचा मेसेज प्राप्त होईल. सदर मेसेज सोबत Vendor Selection Link प्राप्त होईल. त्यातील Vendor निवडल्यानंतर लाभार्थ्याला पडताळणीसाठी OTP प्राप्त होईल.

४. प्राप्त OTP चा वापर करून लाभार्थी Vendor निवड करेल ही निवड केलेनंतर संगणक प्रणालीद्वारे Vendor चे नावे कार्यादेश (Work Order) Auto generate होईल.

५. पात्र झालेल्या लाभार्थ्यांची माहिती निवडलेल्या Vendor ला Vendor लॉगईनला दिसेल व ते काम आपोआप वितरीत होईल.

६. यानंतर प्रकल्पस्थळाची लाभार्थी, Vendor व महाऊर्जा प्रतिनिधी समवेत पहाणी होईल. Joint Survey Report हे अर्ज आलेनंतर पाच दिवसात होणे अपेक्षित आहे. महाऊर्जाकडील तांत्रिक कर्मचा-यांची संख्या पाहता ही बाब साध्य होणेसाठी महावितरण कर्मचा-यांची मदत घ्यावी. महावितरणने मुख्यमंत्री सौर कृषिपंप योजना अंमलबजावणी करताना संबंधित लाईनमन (Lineman) मार्फत सर्व्हे केलेला होता. तीच कार्यपध्दती महाऊर्जानेही अवलंबवावी. यासाठी प्रति युनिट मानधनाचा दर महाऊर्जाने ठरवावा व त्या कर्मचा-यांना तपासणी पूर्ततेनंतर त्यांचे बँक खात्यात अदा करावा. महावितरण यासाठी आवश्यक ते कार्यालयीन आदेश काढतील व आवश्यक ती मदत करतील. सदर JSR पहाणी मोबाईल ॲपद्वारे अपलोड करण्यात येईल. सदर

पहाणी अहवालाची पडताळणी लाभार्थ्यांच्या डिजीटल स्वाक्षरीद्वारे केली जाईल. यासाठी OTP / आधार कार्ड (Aadhar Card) वापरण्यात येईल.

७. JSR मध्ये अमान्य झालेले लाभार्थ्याला तो मेसेजद्वारे अपात्र झाल्याचे कळविण्यात येईल व त्याचे पैसे परत देण्याची कार्यवाही सुरु झाल्याचा मेसेज पाठविण्यात येईल. याकरिता अर्जदाराकडून IFSC क्रमांक व बँक खाते क्रमांक घेण्यात यावा. पैसे परत करणेचा कालावधी आठ दिवसापेक्षा जास्त असणार नाही. अर्ज अमान्य होणेचे कारण DGM स्तरावरून कळविणेत यावे.

८. यानंतर Vendor सौरपंप आस्थापित करण्याचे काम पुर्ण करेल व त्या अनुषंगाने कार्यान्वीत पंपाची माहिती (Details) व फोटो मोबाईल ॲपद्वारे मुख्य संकेतस्थळावर पाठवेल.

९. आस्थापित पंपाची रेग्युलर आरएमएस महाऊर्जाच्या संकेतस्थळावर दिसू लागल्यानंतर १० दिवसात सदर पंपासाठीचे प्रथम देयक अदा करण्यात येईल. त्यासाठी टप्पे व कालावधी महाऊर्जाने निश्चित करून द्यावा. AMR/ RMS येत असल्यास सर्व पंपाची पुन्हा तपासणी करणे आवश्यक नाही. संगणकाद्वारे randomly निवडलेल्या कामाची तपासणी करण्यात यावी.

१०. आस्थापित पंपाची महाऊर्जामार्फत तपासणी करण्यासाठी मुद्दा क्र. ६ मध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करावी.

११. पंपाची आस्थापना विहित कालावधीत आदेश दिनांकापासून दोन महिन्यात पुर्ण न झाल्यास प्रतिपंप प्रतिदिन रू.१००/- हा दंड सिस्टीम जनरेटेड राहील.

१२. पंपाच्या आस्थापनेनंतर त्याची तपासणी (Verification) Random Sampling प्रमाणे करण्यात येईल. ही तपासणी PO/DGM यांचेमार्फत ३०% याप्रमाणे करणेत येईल.

१३. नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, केंद्र शासनास पाठवावयाचा तपासणी अहवाल सिस्टीमद्वारे भरला जाईल व संबंधित ग्राहकाची ई-साईन घेऊन त्याला आधार OTP मेसेजद्वारे पडताळण्यात येईल. यासाठी आवश्यक तो प्रस्ताव महाऊर्जाने MNRE कडे पाठवावा.

१४. Operation & Maintenance वेळी त्रैमासिक पाहणी Vendor द्वारे करण्यात येईल व सदर अहवाल Vendor मोबाईल ॲपलिकेशनद्वारे मुख्य संकेतस्थळावर (MEDA Dashboard) पाठवावे.

१५. सदर पोर्टलवर रोजचे देयक अदायगीचा हिशोब असावा जेणेकरुन सदर योजनेचा ७०% खर्च झाल्याचा आढावा घेणे सोईचे होईल. ७०% खर्च झालेनंतर UC Software मधून generate व्हावी.

--------